मराठी माणसाचा मानदंड
राजदंड
। पश्चिम महाराष्ट्र ।
www.rajdand.com
follow us : /rajdandlive
RNI Regd. No. 72105/99 वर्ष २६ अंक ३३५ सातारा बुधवार दि.४ सप्टेंबर २०२४ पाने ४ किंमत ५/-

महाराष्ट्रात लाल परीची चाके थांबली

एसटी कर्मचारी संपावर गेल्याने वाहतूक विस्कळीत लालपरीच्या पाचशे फेर्या रद्द

गणेशोत्सवाला अवघे काही दिवस उरलेले असताना महाराष्ट्रात एसटीची सेवा विस्कळीत झाली आहे. एसटी कामगार संयुक्त कृती समितीच्या वतीने प्रलंबित मागण्या मान्य न झाल्याने आजपासून (३ सप्टेंबर) बेमुदत धरणे आंदोलनाचा इशारा दिला. त्यानुसार राज्यातील विविध आगारांमध्ये कामबंद आंदोलन पुकारण्यात आले आहे.

राज्यातील ११ कामगार संघटनांच्या कृती समितीने आंदोलन पुकारले असल्याने ३ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजेपर्यंत २५१ आगारांपैकी ३५ आगार पूर्णतः बंद आहेत. इतर आगारांमध्ये अंशतः किंवा पूर्णतः काम सुरू आहे. मुंबई विभागात सर्व आगारातील वाहतूक सुरळीत चालू आहे. त्यामुळे येथील वाहतूक खंडित झालेली नाही. परंतु, ठाणे विभागातील कल्याण, विठ्ठलवाडी आगार पूर्णतः बंद आहेत. विदर्भातील सर्व आगारातील वाहतूक सुरू आहे. तेथे बंदचा प्रभाव दिसून आलेला नाही. परंतु, मराठवाड्यातील लातूर आणि नांदेड विभागात बहुतेक आगार बंद आहेत.

पश्चिम महाराष्ट्रात कोल्हापूर आणि सोलापूर विभागातील वाहतूक व्यवस्थित सुरू आहे. पुणे जिल्ह्यातील शिवाजीनगर, वल्लभनगर, भोर, सासवड, बारामती, तळेगाव हे आगार पूर्णतः बंद आहेत. सांगली जिल्ह्यात मिरज, जत, पलूस हे आगार पूर्णतः बंद आहेत. तसेच सातारा जिल्ह्यातील कराड, वडूज, महाबळेश्वर हे आगार पूर्णतः बंद आहेत. खानदेशात नाशिक जिल्ह्यातील नाशिक, पिंपळगाव, पेठ हे आगार तर जळगाव जिल्ह्यातील भुसावळ, चाळीसगाव हे आगार पूर्णतः बंद आहेत. बाकीच्या ठिकाणी वाहतूक सुरळीत सुरू आहे.

एसटी कामगारांच्या मागण्या काय?

एसटी कामगारांच्या आर्थिक व महत्वाच्या प्रश्नांची सोडवणूक होत नसल्यामुळे कामगारांमध्ये निर्माण झालेली नाराजी विचारात घेऊन एस.टी. महामंडळातील बहुतांशी संघटनांची संयुक्त कृती समिती स्थापन केली. या समितीद्वारे राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे एसटी महामंडळातील कामगारांना वेतन द्यावे, कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग देण्याबरोबरच मागील वेतन वाढीतील फरक दूर करणे, महागाई भत्त्याची थकबाकीची रक्कम देणे, मागील करारातील त्रुटी दूर करणे, याबरोबरच शिस्त व आवेदन पद्धतीमधील बदल, मेडिकल कॅशलेस योजना सर्व कर्मचाऱ्यांना लागू करणे या प्रलंबित मागण्या मान्य करण्यासाठी आंदोलन केले जात आहे.

गणेशोत्सव काळात काय होणार?

गणेशोत्सवानिमित्ताने एसटीला प्रवाशांनी प्रचंड प्रतिसाद दर्शवला असून ४,९५३ जादा बस आतापर्यंत पूर्ण भरल्या आहेत. त्यामुळे हे धरणे आंदोलन संपले नाही तर ऐन गणेशोत्सवात गावी निघणाऱ्या प्रवाशांना मनस्ताप होऊ शकतो.

सततच्या पावसाने भाजीपाला महागला

मेथी, पालक, शेपू, कोथिंबीर, मिरची महाग; चाकवत, पोकळा, तांदळी दिसेनाशी

सातारा : संततधार पावसामुळे आता शेतमालाचे मोठे नुकसान होत असल्याचे समोर येत असून, यामुळे बाजारात सध्या चाकवत, पोकळा, तांदळी अशा भाज्या दिसेनाशा झाल्या आहेत, तर मेथी, पालक, शेपू, कोथिंबीर यांच्या जुड्यांचे दर पन्नास रुपयांच्या घरात गेले आहेत. मिरची, घेवडा, वाघ्या घेवड्याचे दर १२० रुपये किलोच्या घरात गेले आहेत.

ऑगस्ट महिन्यात सलग मुसळधार पाऊस झाल्याने चालू हंगामात तयार होत आलेल्या भाजीपाल्याचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी अतिवृष्टीने शेतातील तयार भाजीपाला सडून गेला आहे. विशेषतः पालेभाज्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतात पाणी साचून राहिल्याने चाकवत, पोकळा, तांदळीसारख्या भाज्या खराब झाल्या आहेत. यामुळे गेल्या आठवडाभरापासून बाजारात भाजीपाल्याची होणारी आवक एकदम घसरली आहे.

साताऱ्यातील बाजारपेठेत गेले काही दिवस चाकवत, पोकळा, तांदळी अशा पालेभाज्या तर दिसेनाशा झाल्या आहेत. टोमॅटो, मिरची, घेवडा पावसामुळे खराब झाल्या असून, त्यांचा दर्जा खालावलेला दिसत आहे. मेथी, पालक, शेपू, कोथिंबिरीची आवकही कमी होत आहे. चांगल्या प्रतीचा भाजीपाला कमी येत असून, त्यासाठी जास्त किंमत मोजावी लागत आहे.

सध्या पालेभाज्यांमध्ये मेथीची जुडी पन्नास रुपये, शेपू चाळीस रुपये, पालक तीस रुपये, तर कोथिंबिरीचा दर जुडीला साठ ते शंभर रुपये झाला आहे. जेवणात महत्त्वाच्या असणाऱ्या पालेभाजांची आवक घटल्याने त्या महाग झाल्या आहेत. आमटीला चव आणणाऱ्या कोथिंबिरीची आवक कमी झाल्याने मंडईत चार-पाच काड्यांच्या वाट्याला चक्क वीस रुपये मोजावे लागत आहेत. मोठ्या आकाराच्या जुडीचा दर शंभरावर पोहोचला आहे.

फळभाज्यांचे दरही वाढले आहेत. घेवडा २० रुपये, तर वाघ्या घेवडा ३० रुपये पावशेर दराने विकला जात आहे. हिरवी मिरची ४० रुपये पावशेर अशी मिळत आहे. गेल्या महिन्यात सलग तीन आठवडे पाऊस पडत होता. त्यामुळे भाज्यांच्या वाढीवर परिणाम झाला, तसेच काही शेतकऱ्यांच्या भाज्यांची उगवणच झालेली नाही. त्यामुळे सध्या जिल्ह्यात सर्वत्र भाज्यांची चणचण भासत आहे. साहजिकच त्यांचे दर वाढले आहेत. विशेषतः पालेभाज्यांची आवक खूपच कमी होत आहे. यामुळे चाकवत, पोकळा, तांदळी अशा पालेभाज्या दिसेनाशा झाल्या आहेत.

बारामतीत जनसन्मान यात्रेला लोटला जनसमुदाय; अजित पवारही भारावले

बारामती : राष्ट्रवादी काँग्रेसच्या जनसन्मान यात्रेच्या निमित्ताने बारामती शहरात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली शहरात काढण्यात आलेल्या रॅलीस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. राष्ट्रवादीच्या या जनसन्मान यात्रेला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनाही बळ मिळाले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे शहरात ठिकठिकाणी मोठ्या जल्लोषात उत्स्फूर्तपणे स्वागत करण्यात आले. जेसीबीच्या साह्याने फुलांचा वर्षाव करून स्वागत करण्यात आले. या रॅलीमध्ये जय पवार देखील सहभागी झाले होते. या रॅलीनंतर झालेल्या जाहीर सभेत हजारो महिलांची उपस्थिती होती. जनतेच्या या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार भारावले. यावेळी पवार यांच्यावर महिलांनी फुलांचा वर्षाव करत त्यांचे औक्षण करून राख्या देखील बांधल्या.

बारामती शहरात सकाळी १० वाजता उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पेन्सिल चौकात आगमन झाले. यावेळी त्यांच्या गाडीच्या ताफ्यासोबत हजारो कार्यकर्ते दुचाकी घेऊन रॅलीत सहभागी झाले होते. एकच वादा, अजित दादा, अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या. बारामती औद्योगिक वसाहत परिसरातील पेन्सिल चौकातून रॅली निघाल्यानंतर भिगवण रोडने रिंग रोड मार्गे इंदापूर रोडने डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा या ठिकाणी रॅलीचे आगमन झाले. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. जय पवार यांनी देखील पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यानंतर इंदापूर चौक, गुणवडी चौक या मार्गे रॅली कसबा येथील शिवाजी उद्यानात पोहोचल्यानंतर उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर रॅली गुणवडी चौकातून गांधी चौक मार्गे, स्टेशन रोड मार्गे सुभाष चौक, भिगवन चौक या ठिकाणाहून मिशन हायस्कूल ग्राउंड या ठिकाणी होणाऱ्या जाहीर सभेच्या ठिकाणी दाखल झाली. यावेळी फुलांचा वर्षाव देखील मोठ्या प्रमाणावर करण्यात आला. रॅलीमध्ये कार्यकर्त्यांसह नागरिक देखील सहभागी झाले होते. शहरातील रस्ते गर्दीने फुलून गेले होते.

सभेच्या ठिकाणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आगमन होताच महिलांनी औक्षण करून स्वागत केले. त्यांना राख्या बांधण्यासाठी महिलांची झुंबड उडाली. या सभेच्या ठिकाणी महिलांसह नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. महिलांसह नागरिकांच्या गर्दीने संपूर्ण मंडप खचाखच भरला होता. दरम्यान बारामती मधील जनसन्मान यात्रेच्या तयारीसाठी कार्यकर्ते व पदाधिकारी गेली चार दिवसांपासून झटत होते. राष्ट्रवादीचे युवा नेते पार्थ पवार हे स्वतः नियोजन पाहत होते. राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नगरसेवक किरण गुजर यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उत्कृष्ट नियोजन केले होते.

वनराज आंदेकर खून प्रकरणात १३ जणांना अटक

पुणे : महाराष्ट्राला हादरवून टाकणाऱ्या पुण्यातील माजी नगरसेवकाच्या खून प्रकरणात पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे. खुनाच्या घटनेनंतर फरार झालेल्या आरोपींनी ताम्हिणी घाटात आपला तळ ठोकला होता. मात्र, पोलिसांनी ताम्हिणी घाटातून आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत. यापूर्वी हत्या झालेल्या वनराज आंदेकरांच्या बहिणींना पोलसांनी अटक केली होती. त्यानंतर, आज सायंकाळी ताम्हिणी घाटातून १३ जणांना अटक करण्यात आली आहे. जेवण्यासाठी हे सगळे जणं ताम्हिणी घाट परिसरात थांबले होते, जेवण झाल्यानंतर तामिनी घाटातून पुढे मार्गस्थ होण्याच्या आधीच पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतलं. त्यामुळे, पोलिसांनी याप्रकरणात गंभीरतेने लक्ष घालून पुण्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जोमाने प्रयत्न केल्याचं दिसून येतं. या आरोपींच्या अटकेसाठी पुणे पोलिसांनी अनेक पथके नेमून शोधासाठी रवाना केली होती. दरम्यान, आंदेकर कुटुंब गेल्या काही वर्षांतराजकारणात सक्रिय झालं. मात्र पुण्याच्या गुन्हेगारी विश्वात या कुटुंबाचा रक्तरंजित इतिहास तब्ब्ल पाच दशकांचाय . त्यामुळं वनराज आंदेकरांच्या हत्येनंतर पुण्यातील

मोबाईल हॉटस्पॉट न दिल्याने एकाचा धारदार शस्त्राने खुन

हडपसर : हडपसर मध्ये गाडीतळ उत्कर्षनगर सासवड रोड फुटपाथवर मोबाईल हॉटस्पॉट न दिल्याच्या कारणामुळे एकाचा खून करण्यात आला.

मोबाईल हॉटस्पॉट वादावरून झालेल्या खुनाचे गुन्ह्यातील चौघां आरोपींना हडपसर तपास पथकाने १२ तासाचे आत अटक केली.

दिनांक ०२.०९.२०२४ रात्री ०२.१५ वा नियंत्रण कक्ष पुणे शहर येथून फोन कॉल प्राप्त झाला त्यामध्ये एक इसम सासवड रोडवर हडपसर गाडीतळ येथे फुटपाथवर इसम रक्ताच्या थारोळ्यात पडला असल्याची खबर मिळाली होती.तो मयत झाला आहे.

उत्कर्षनगर सोसायटी समोरील फुटपाथवर, हडपसर पुणे येथे एक इसम रक्ताचे थारोळ्यात पडलेला दिसला तसेच त्याचे चेहऱ्यावर कोणीतरी अज्ञात इसमाने धारदार शस्त्राने निर्घणपणे वार करून चेहरा छिन्नविच्छीन्न केल्याचे दिसले. खून झालेल्या इसमाचे नाव वासुदेव रामचंद्र कुलकर्णी वय ४७ वर्षे रा. बी/५, प्लॅट नं ०८, उत्कर्षनगर सोसायटी, सासवड रोड हडपसर पुणे असा असल्याची माहीती प्राप्त झाली. गुन्ह्याचे गांभिर्य ओळखून संतोष पांढरे, वरिष्ठ पोलीस पोलीस निरीक्षक हडपसर यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे व सुचनांप्रमाणे तपासपथक अधिकारी अर्जुन कुदळे, सहा पोलीस निरीक्षक, महेश

आर. जी. कर रुग्णालयाचे माजी प्राचार्य संदीप घोष मोठ्या रॅकेटचा भाग

कोलकाता : येथील आरजी कर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाचे माजी प्राचार्य संदीप घोष हे एका मोठ्या रॅकेटचा भाग होते, याचा पदार्फाश करणे आवश्यक होते असं सीबीआयने विशेष न्यायालयाने सांगितलं. रुग्णालयातील भ्रष्टाचार आणि आर्थिक अनियमिततेच्या आरोपांची चौकशी सीबीआयकडून केली जात आहे. याप्रकरणी संजय घोषला १० सप्टेंबरपर्यंत सीबीआय कोठडी देण्यात आली असून याप्रकरणी १२ सीबीआय अधिकारी आणि २५ सीआरपीएफ जवान त्याच्या संरक्षणासाठी उपस्थित होते. परंतु, अशा परिस्थितीतही त्याच्यावर दोनदा हल्ला करण्याचा प्रयत्न झाला. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

संदीप घोष याला आंदोलक महिला वकिलांनी कोर्टरुममध्ये कानाखाली मारली तसंच, बाहेर आंदोलकांनीही त्याच्या डोक्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. संदीप घोषला सोमवारी भ्रष्टाचारप्रकरणी अटक करण्यात आली. तसंच, घोषचा सुरक्षा रक्षक अफसर अली खा (४४), आरजी कर रुग्णालयातील एक विक्रेता बिप्लब सिंघा (५२), माँ तारा ट्रेडर्सचा मालक सुमन हाजरा (४६) यांनाही पोलिसांनी अटक केली आहे. त्यांनाही १० सप्टेंबरपर्यंत सीबीआय कोठडी देण्यात आली आहे.

सीबीआयचे वकील रामबाबू कनोजिया यांनी न्यायालयाला सांगितलं की हे चारही आरोपी या मोठ्या रॅकेटचा भाग होते. यात आणखी लोकांचा समावेश असण्याची शक्यता आहे. हे एक मोठं रॅकेट आहे, याची चौकशी करणे आवश्यक आहे. दुपारी साडेतीनच्या सुमारास संदीप घोष आणि अटकेत असलेल्या इतरजण सीबीआयच्या कार्यालयातून बाहेर पडले तेव्हा निझाम पॅलेसमधील सरकारी कार्यालयांचे कर्मचारी आणि खासगी कार्यालयांचे कर्मचारी रस्त्यावर जमा झाले होते. त्यांनी चोर चोर म्हणत पीडितांना न्याय देण्यासाठी घोषणाबाजी केली.

अलिपूर येथे आंदोलकांचा मोठा जमाव त्यांची वाट पाहत होता. तिथेही त्यांच्याविरोधात घोषणाबाजी झाली. सीबीआयच्या पथकाने त्यांना कडेकोट सुरक्षा पुरवून कोर्टरुममध्ये नेले. तसंच, आंदोलकांना बाहेर ठेवण्यासाठी पहिल्या मजल्यावरील कोर्टरुमकडे जाणारा मुख्य दरवाजाही बंद केला गेला.

कोर्टरुममध्ये संदीप घोष शिरताच महिला वकिलांनी त्याला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. तर काहींनी चपलाही भिरकावल्या. या काळात संदीप घोषसह तिघांचेही चेहरे झाकले गेले होते. त्यामुळे वकिलांच्या एका गटाने गोंधळ घालत त्यांचे चेहरे उघडे करण्याची मागणी केली. जवळपास १५ मिनिटे हा गोंधळ सुरू होता. त्यानंतर ४. ०५ वाजता न्यायालयीन कामकाज सुरू झाले.

सीबीआयने चौघांवरही सरकारी कर्मचाऱ्यांकडून बेकायदा पैसे घेतल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल केला आहे. भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा कलम ७, फसवणूकविरोधातील कलम ४२०, गुन्हेगारी कट रचने कलम १२०, बनावट दस्ताऐवज बनवणे कलम ४६७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सीबीआयचे वकील कनोजिया यांनी या गुन्ह्याची मोठी व्याप्ती असल्याचं म्हटलं आहे. तसंच हा अत्यंत गंभीर गुन्हा असल्याचं सांगत आरोपींना १० दिवसांच्या सीबीआय कोठडीची मागणी केली. आम्हाला आणखी पुरावे गोळा करावे लागतील. तपासादरम्यान आणखी काही गुन्हे समोर येऊ शकतात, असं सीबीआयने न्यायालयात सांगितलं.

दरम्यान, संदीप घोषचे वकील झोहेब रौफ यांनी कमी कोठडीची मागणी केली. संदीप घोषने आतापर्यंत तपासाल सहकार्य केलं असून सोमवारी अटक झाली तेव्हाही तो सीबीआयच्या कार्यालयात गेला होता. प्रत्येक दिवशी त्याला समन्स पाठवण्यात आले होते. तो चौकशीसाठी कायम उपस्थित राहिला आहे. त्याला नजरकैदेत ठेवण्याची विनंती विचारात घ्यावी, असं रौफ म्हणाले. तसंच इतर तिघांनी जामिनासाठी अर्ज केला होता. परंतु, त्यांचा जामीन अर्ज फेटाळण्यात आला.

सुनावणी संपल्यानंतर त्याला कोर्टातून बाहेर आणण्यात आले. तेव्हाही आंदोलकांनी निदर्शने केली.

८ सप्टेंबर रोजी कोथरूड मध्ये गांधी दर्शन शिबीर

पुणे : महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दलाच्या वतीने रविवार, दि. ०८ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत 'गांधी दर्शन' शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. कोथरूड येथील गांधी भवनच्या दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात हे शिबीर होणार आहे. वर्धा येथील सेवा ग्राम चे सचिव विजय तांबे (कृत्रिम बुद्धिमत्ता),डॉ.कुमार सप्तर्षी (महात्मा गांधी आणि सरदार पटेल), निरंजन टकले (राष्ट्रवाद विरुद्ध द्वीराष्ट्रवाद) हे मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. ' 'गांधी दर्शन' विषयावरचे हे चौदावे शिबीर आहे.

अधिक माहितीसाठी जांबुवंत मनोहर (९०२८६३३७२०),एड. स्वप्नील तोंडे (९९२३५२३२५४) तेजस भालेराव (९१७२४८७०१९) यांच्याशी संपर्क साधता येईल. शिबिरासाठी दोनशे रुपये नोंदणी शुल्क आहे. त्यात शिबिरस्थळी नाश्ता,चहा आणि भोजनाचा समावेश आहे .स्पर्धा परीक्षाची तयारी करणारे युवक युवती आणि महाविद्यालयीन विद्यार्थी यांना विनामूल्य प्रवेश आहे.

संविधान जागर यात्रा ६ सप्टेंबरला मुंबईत दाखल होणार

मुंबई : संविधान जागर समिती महाराष्ट्र आयोजित संविधान जागर यात्रा ९ ऑगस्ट २०२४ रोजी सत्याग्रह भूमी चवदार तळे महाड येथे भारतरत्न संविधानकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना तसेच रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करून क्रांती दिनाच्या दिवशी सुरुवात करण्यात आली होती. ती संविधान जागर यात्रा ६ सप्टेंबर ला मुंबईत दाखल होणार असल्याची माहिती संविधान जागर समितीचे संयोजक नितिनभाऊ मोरे यांनी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

संविधान जागर यात्रा आजपर्यंत महाड, रायगड, खेड. रत्नागिरी, पतीत पावन मंदिर, सिंधुदुर्ग, कणकवली, कोल्हापूर शाहू समाधी दर्शन, हातकणंगले, सांगली पेठ नाका. सातारा, पिंपरी चिंचवड, पुणे कॅन्टोन्मेंट, महात्मा फुले वाडा, वस्ताद लहुजी साळवे समाधी, अहमदनगर, माळशिरस, सोलापूर, तुळजापूर, उमरगा, लातूर, उदगीर, देगलूर, नांदेड, हिंगोली, परभणी, केज, बीड, संभाजीनगर, बदनापूर, जालना, चिखली, मेहकर, वाशिम, उमरखेड, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, अर्जुनी मोरगाव, गोंदिया, भंडारा, उमरेड, दीक्षाभूमी, नागपूर, वर्धा, अमरावती, दर्यापूर, मुर्तीजापुर, अकोला, भुसावळ या जिल्ह्यामध्ये प्रवास करत सभा बैठका घेत जळगाव मध्ये दखल झाली. जळगाव वरून धुळे नाशिक कल्याण अंबरनाथ उल्हासनगर ठाणे करत संविधान जागर यात्रा ६ सप्टेंबर रोजी सहा हजार किलोमीटर चा प्रवास करून मुंबईत दाखल होणार आहे. संविधानाबद्दल निर्माण झालेला गैरसमज दूर करण्याच्या दृष्टिकोनातून यात्रा जवळ जवळ यशस्वी झाली आहे असे मोरे यांनी सांगितले. समारोप साठी केंद्रीय मंत्री किरेन रिजीजू व केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

ईबीसी विद्यार्थ्यांना सहा महिन्यांची मुदत!

मुंबई : व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश अर्जासमवेत जात पडताळणी प्रमाणपत्र जोडण्याचे बंधनकारक करण्यात आलेले आहे. मात्र सध्या जात पडताळणी समित्यांकडे लाखोंच्या प्रमाणात पेंडन्सी असल्यामुळे हजारो विद्यार्थी मागास प्रवर्गातून प्रवेशापासून वंचित राहण्याचा धोका निर्माण झाला आहे.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होणार नाही यासाठी राज्य सरकारने तात्काळ अनुसूचित जाती , जमाती , विमुक्त जाती भटक्या , जमाती व इतर मागासवर्ग प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेशासाठी जात पडताळणी सादर करण्याची मुदत सहा महिने वाढवावी अशी मागणी पुण्यातील रिपब्लिकन युवा मोर्चाचे नेते राहुल डंबाळे यांनी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री तसेच सामाजिक न्याय विभागाच्या इतर अधिकाऱ्यांकडे केली आहे.

२०२४ - २५ च्या शैक्षणिक वर्षांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची पडताळणीसाठी मोठी धडपड सुरू आहे. या संदर्भामध्ये प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने समाज कल्याण आयुक्त व बार्टी महासंचालक सुनील वारे यांची भेट घेऊन राहुल डंबाळे यांनी वरील मागणीचे मुख्यमंत्री यांच्या नावाचे निवेदन सादर केलेले आहे.

एसईबीसी विद्यार्थ्यांसाठी दिलासा

सदर निवेदनामध्ये त्यांनी राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने २२ जुलै २०२४ रोजी एसईबीसी विद्यार्थ्यांसाठी अशा प्रकारची सवलत लागू करून त्यांना मात्र सहा महिने प्रमाणपत्रासाठी मुदतवाढ दिलेली आहे. एसबीईसीच्या विद्यार्थ्यांसाठी जे नियम व निकष वापरण्यात आलेले आहे त्यानुसारच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती , विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देखील याचा लाभ मिळायला हवा त्यामुळे राज्य सरकारने एसबीसीच्या विद्यार्थ्यांसाठी देखील परिपत्रक काढून त्यांना सवलत देण्याचे काम करावे अशी विनंती केली आहे.

पडताळणी कायद्याचे उल्लंघन

जात पडताळणी अधिनियमन २०१२ मध्येच अर्ज केल्यापासून ९० दिवसांमध्ये पडताळणी सादर करण्याचे नमूद असतानाही सीईटी विभागाकडून मात्र या नियमाला हरताळ फासवत मनमानी पद्धतीने किंबहुना केवळ मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान व्हावे या गैरउद्देशानेच चुकीचे परिपत्रक काढून प्रवेशावेळीच जात प्रमाणपत्र देण्याचे बंधन घातलेले आहे. हे परिपत्रक संपूर्णतः चुकीचे असून जात प्रमाणपत्र अधिनियमांचे उल्लंघन करणारे असल्यामुळे ती दुरुस्ती होणे आवश्यक असल्याचे मत राहुल डंबाळे यांनी व्यक्त केले.

बार्टीकडून दखल

बार्टी महासंचालक सुनिल वारे यांनी तात्काळ या विषयाची गांभीर्याने दखल घेऊन राज्य शासन व व्यावसायिक अभ्यासक्रम सीईटी आयुक्त यांना अशा प्रकारचे बंधन लादु नये तसेच त्यांनी काढलेल्या परिपत्रकात दुरुस्ती करून अशा विद्यार्थ्यांना पडताळणी अर्ज केल्याच्या पावती च्या अनुषंगाने प्रवेश द्यावेत अशा आशयाचे पत्र लिहिलेले आहे.

सदर बाबी अत्यंत गंभीर असून यामुळे लाखो विद्यार्थ्यांचे नुकसान होणार असल्याने या विरोधात उद्या ४ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता जात पडताळणी समितीच्या पुणे कार्यालयासमोर विश्रांतवाडी येथे राहुल डंबाळे हे एक दिवसीय धरणे आंदोलन करणार आहेत.

मुख्यमंत्र्यांनी व राज्य शासनाने यामध्ये तात्काळ हस्तक्षेप करून विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी डंबाळे यांनी केली आहे.

अतिक्रमण निरीक्षक ३ महिन्यांनी बदलण्याच्या निर्णयाचे स्वागत

पुणे : अतिक्रमण निरीक्षक,सहाय्यक अतिक्रमण निरीक्षक यांचे संबंधितांशी हितसंबंध निर्माण होऊ नयेत,म्हणून दर तीन महिन्यांनी बदल्या करण्याचे धोरण पुणे महानगरपालिका अतिक्रमण विभागाने तयार केल्याबद्दल जनशक्ती पथारी विक्रेता कल्याणकारी संघाच्यावतीने स्वागत करण्यात आले आहे. जनशक्ती पथारी विक्रेता कल्याणकारी संघाचे अध्यक्ष संजय आल्हाट, सरचिटणीस रणजीत सोनावळे ,कन्हैया पाटोळे या पदाधिकाऱ्यांनी अतिक्रमण विभागाचे उपायुक्त सोमनाथ बनकर यांची भेट घेऊन या धोरणाचे स्वागत केले आणि पाठिंबा व्यक्त केला. बायोमेट्रिक सर्वे होत नाही तोपर्यंत पथारी फेरीवाला विक्रेत्यांवर कारवाई करू नये,अशी मागणीही करण्यात आली.

अतिक्रमण विभागातील कर्मचाऱ्यांच्या जर तीन महिन्याने ऑनलाईन बदली होणार असतील अतिक्रमण कारवाईत सातत्य राहील . वर्षानुवर्षे एकाच क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत राहून काम करणाऱ्या निरीक्षकांमुळे कारवाईत दुजाभाव होत होता. अतिक्रमण विरोधी कारवाईत अधिकाधिक पारदर्शीपणा यावा,त्याचा नियमित अहवाल आयुक्तांना दिला जावा ,असे आवाहन जनशक्ती पथारी विक्रेता कल्याणकारी संघाच्यावतीने करण्यात आले . पथारी विक्रेत्यांचे सर्वेक्षण करून केंद्र सरकारच्या योजनेचे लाभ त्यांना मिळावेत अशी मागणी याआधीच संघाने केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांना भेटून केली होती.तसेच आयुक्त पातळीवर वारंवार पाठपुरावा केला होता.

मदर तेरेसा फाउंडेशनची नशा मुक्ती जनजागृती

मुंबई : शिक्षण, सदभावना आणि राष्ट्रप्रेम विकसित करण्यासाठी मदर तेरेसा फाउंडेशन चे देशभर कार्य सुरू आहे. समाजाला व्यसनमुक्त करण्यासाठी आत्तापर्यंत फाउंडेशन ने ४२ नशा मुक्ती केंद्र सुरू केली आहेत व अजून त्यांची संख्या वाढत असून त्यामार्फत जनजागृती करण्यात येत आहे. अशी माहिती फाउंडेशन चे राष्ट्रीय संयोजक व माजी आमदार समाजवादी पार्टी चे राष्ट्रीय सचिव मोहम्मद अरशद खान मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

फाउंडेशनच्या राष्ट्रीय उपाध्यक्षा उपासना वैश्य यांनी सांगितले की, महिला सक्षमीकरण कार्यशाळा व कुटुंब सल्ला केंद्र फाउंडेशन ने सुरू केले आहे. तर प्रदेश अध्यक्ष अल्ताफ सनाउल्लाह अंसारी म्हणाले, तरुण वर्गात उद्योग व्यवसाय वाढावा यासाठीही फाउंडेशन कार्य करत आहे.

राष्ट्रीय मानवाधिकार व न्याय प्राधिकरण चे अध्यक्ष अहमद कुरैशी हे न्याय दान विभागाच्या माध्यमातून कायदेविषयक मार्गदर्शन करत आहेत. यावेळी काशिराम विचार मंचचे प्रदेश अध्यक्ष रहमतुल्लाह खान, अब्दुल रहमान तारिक उपस्थित होते.

एससी, एसटी आरक्षणाच्या उपवर्गीकरणाचा आदेश तात्काळ रद्द करा : शैलेंद्र चव्हाण

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) गटाचा कार्यकर्ता निर्धार मेळावा संपन्न

हडपसर /पुणे : अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (एससी, एसटी) आरक्षणाच्या उपवर्गीकरणाचा सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आदेश तात्काळ रद्द करुन यासंदर्भात संसदेने अध्यादेश काढावा, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पुणे शहराच्या वतीने आयोजित कार्यकर्ता निर्धार मेळाव्यात शैलेंद्र चव्हाण यांनी व्यक्त केले.

रिपाइं (आठवले) गटाच्या वतीने शैलेंद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकर्ता निर्धार मेळावा गंज पेठेतील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक येथे आयोजित करण्यात आला होता.यावेळी स्वागताध्यक्ष अशोक शिरोळे, शहर सरचिटणीस महिपाल वाघमारे, 'रिपाइं' महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष रोहिदास गायकवाड, असित गांगुर्डे, पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष मोहन जगताप, बाबुराव घाडगे, भगवान गायकवाड, जगन्नाथ गायकवाड, प्रदेश सदस्य एम. बी. वाघमारे, हिमाली कांबळे, रफिक दफेदार, वसंत बनसोडे, श्याम गायकवाड, निलेश आल्हाट सह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित उपस्थित होते.

शैलेंद्र चव्हाण म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात तिसऱ्यांदा 'रिपाइं' नेते रामदास आठवले यांना राज्यमंत्री पद देण्यात आले. मात्र, आंबेडकरी जनता यावर समाधानी नाही. सलग तीन निवडणुकांत भारतीय जनता पार्टीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिलेल्या रिपब्लिकन पक्ष व रामदास आठवले यांना योग्य सन्मान देऊन त्यांना कॅबिनेट मंत्री द्यावे.अशी आंबेडकरी जनतेची मागणी आहे. समाजाच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर विधानसभा निवडणुकीत याची नाराजी स्पष्टपणे दिसेल असे चव्हाण यांनी म्हणाले.निर्धार मेळाव्यात विविध विषयांवर चर्चा झाली.

मेळाव्यात अशोक शिरोळे, रोहिदास गायकवाड, मोहन जगताप, बाबुराव घाडगे, भगवान गायकवाड, हिमाली कांबळे यांच्यासह अन्य मान्यवरांनी आपल्या भूमिका मांडल्या. महिपाल वाघमारे यांनी सूत्रसंचालन व संयोजन केले.

मेळाव्यातील प्रमुख ठराव : मागासवर्गीय महामंडळाच्या लाभार्थींचे कर्ज माफ करावे, राज्यात समाजकल्याण खात्याला स्वतंत्र मंत्री असावा, मागासवर्गीयांची शिष्यवृत्ती थेट बँक खात्यात जमा करावी,'बार्टी'ला पूर्वीप्रमाणे स्वायतत्ता बहाल करावी, मागासवर्गीयांचा निधी अन्यत्र वळवू नये, यासाठी कायदा पारित करावा,कष्टकरी महिलांना दरमहा ३००० रुपये निवृत्ती वेतन देण्यात यावे,महिलांच्या संरक्षणासाठी शक्ती कायद्याची कडक अंमलबजावणी व्हावी,मागासवर्गीय बेरोजगारांना जामीनाची अट रद्द करून बिनव्याजी कर्ज द्यावे अशा विविध मागण्या मेळाव्यात करण्यात आल्या.

क्षेत्र भुलेश्वर मंदिर परिसरात वन उद्यानाचा विकास करण्यासाठी २ कोटींचा प्रस्ताव सादर करण्याचे आदेश : राहुल कुल

दौंड : पुरातन आणी प्रसिद्ध तिर्थक्षेत्र श्री . भुलेश्वर मंदिर परिसर आणखी वन उद्यान विकास यासाठी २ कोटींचा प्रस्ताव सादर करण्याचे आदेश देण्यात आल्याची माहिती दौंड चे आमदार राहुल कुल यांनी दिली आहे.

दौंड व पुरंदर तालुक्याच्या सीमेवर असलेल्या पांडवकालीन श्री. क्षेत्र भुलेश्वर मंदिर परिसरातील वन उद्यानाचा विकास व्हावा म्हणून नुकतेच वनमंत्री मा. नामदार श्री. सुधीर भाऊ मुनगंटीवार यांना निवेदन दिले होते. त्याबाबत त्यांनी वन विभागाचे प्रधान सचिव श्री. वेणुगोपाल रेड्डी साहेब यांना बैठक घेण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार दुरदृश्य प्रणालीद्वारे आज बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीत श्री. क्षेत्र भुलेश्वर मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर वन जमिन असून या ठिकाणी संपूर्ण पुणे जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणवर भाविक भक्त येत असतात, श्रावण महिन्यात मोठी यात्रा या ठिकाणी भरत असते. भाविक भक्तांना चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी वन उद्यानाचा विकास करण्यासाठी २ कोटींचा निधी मिळावा अशी मागणी केली.

यावेळी प्रधान सचिव श्री. वेणुगोपाल रेड्डी साहेब यांनी २ कोटींच्या कामाचे प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे आदेश दिले आहेत. बैठकीला मुख्य वन संरक्षक पुणे श्री. एन.आर. प्रवीण, उपवन संरक्षक पुणे श्री. महादेव मोहिते, उपसचिव श्री. विवेक होशिंग आदी उपस्थित होते.

रिपाइं पुणे शहर संघटक सचिव पदी विशाल धावारे यांची निवड

हडपसर : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पुणे शहर संघटक सचिव पदी हांडेवाडीतील सामाजिक कार्यकर्ते विशाल धावारे यांची निवड करण्यात आली निवडीचे पत्र रिपाइं प्रभारी अध्यक्ष पुणे शहर शेलद्र चव्हाण यांच्या हस्ते देण्यात आले.

यावेळी रिपाइं कार्यकर्ते माजी शहराध्यक्ष अशोक शिरोळे , मोहन जगताप, रोहिदास गायकवाड,बाबुराव घाडगे, महिपाल वाघमारे ,निलेश आल्हाट, हिमाली कांबळे,भगवान गायकवाड,वसंत बनसोडे, शाएम.बी. वाघमारे,रफिक दफेदार, शाम गायकवाड, व पदाधिकारी उपस्थित होते. पक्षाने जी संधी दिली त्याचे मी पक्ष वाढीसाठी प्रयत्न करत विविध समस्या पक्षाच्या माध्यमातून सोडविणार आहे असे विशाल धावारे यांनी निवड झाल्यावर आपले मत व्यक्त केले.

हडपसरचे आमदार चेतन तुपे पाटील यांना 'उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार' राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान

हडपसर : राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या वतीने दिला जाणारा 'उत्कृष्ट संसदपटू 'पुरस्कार हा अत्यंत प्रतिष्ठेचा दिला जाणारा पुरस्कार हा कुठल्याही खाजगी किंवा सार्वजनिक संस्थेकडून दिलेला नसून जगभरातील लोकशाही पाळणा-या विधिमंडळांची राष्ट्रकुल संसदीय मंडळ कॉमनवेल्थ पार्लमेंटरी असोसिएशन या अधिकृत संघटनेकडून पुरस्कार प्रदान करण्यात येतो. 'उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार ' हडपसर विधानसभेचे आमदार चेतन तुपे पाटील यांना भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार स्वीकारताना, हडपसर मतदार संघातील नागरिकांनी माझ्यावर टाकलेला विश्वास आहे.आता जबाबदारीवाढली असून त्यासाठी अधिक जोमाने काम करावे लागणार आहे.याची मला पूर्ण जाणीव आहे. हीच भावना विश्वासाची प्रेरणा घेऊन मी त्यासाठी कायम प्रयत्नशील राहील, सर्वांचा मतदार संघातील जनतेचा आणि माझ्या सर्व सहकाऱ्यांचा मी सदैव ऋणी आहे

चेतन तुपे पाटील
आमदार हडपसर विधानसभा

यावेळी व्यासपीठावर विधिमंडळातील मंत्री महोदय, आमदार आदी मान्यवर उपस्थित होते.

विधिमंडळाच्या कामकाजातील नियमित सहभाग,विधिमंडळातील नियमांचे पालन,संसदीय परंपरांचे शिष्टाचाराचे भान ठेवून उपस्थित करावयाच्या सर्व विषयाचे आकलन विधिमंडळात मुद्देसूद अभ्यास पूर्ण विषय मांडणी,वापरलेले कौशल्य,उत्कृष्ट भाषण शैली,उत्कृष्ट संवाद वक्तृत्व दर्जेदार भाषणे अशा विविध सगळ्या बाबी पडताळून पुरस्कारासाठी नेमलेल्या तज्ञ समितीकडून शिफारस केली जाते आणि राष्ट्रकुल संसदीय मंडळाकडून पुरस्कार जाहीर केले जातात,

मानाचा पुरस्कार स्व. माजी मंत्री गिरीश बापट यांना वीस वर्षापूर्वी दुस-या टर्म मध्ये देण्यात आला होता.

आमदार चेतन तुपे यांना पहिल्या टर्म मध्येच 'उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार ' मिळाल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहेत.

मी हा पुरस्कार हडपसर विधानसभा मतदारसंघातील सर्व नागरिक बंधू-भगिनी व पुणेकरांच्या वतीने अत्यंत विनम्रतापूर्वक स्वीकारत आहे.

हा माझा एकट्याचा सन्मान नसून माझ्या सर्व मतदारांचा गौरव आहे असे मी मानतो. मी हा पुरस्कार माझे वडील स्वर्गीय खासदार विठ्ठल तुपे, माझ्या आई लिलावती विठ्ठल तुपे, माझे सर्व कुटुंबीय, माझा तुपे परिवार, माझे सर्व कार्यकर्ते, सर्व मित्र परिवार आणि हितचिंतक तसेच मतदार संघातील सर्व नागरिक बंधू-भगिनींना कृतज्ञतापूर्वक नम्र भावनेने अर्पण करतो.

सज्जनगड पायरी मार्ग झाला मोकळा

साधकांनी केले श्रमदान दुर्गप्रेमी कडून कौतुक

कास पठार : उपासने बरोबरच श्रमदानाची शिकवण देणाऱ्या डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या शेकडो साधकांनी आज सोमवारी दुपारी दोन ते चारच्या दरम्यान श्रमदान करीत किल्ले सज्जनगड पायरी मार्गावरील पडलेला बुरुज श्रमदान करीत समर्थ भक्तांसाठी पायरी मार्ग खुला करून दिला. प्रतिष्ठानच्यावतीने महाराष्ट्रभर नेहमीच श्रमदान मोहीम, दासबोध बैठका, रक्तदान शिबिर असे समाजपयोगी उपक्रम सुरू असतात ढासळलेल्या बुरुजाच्या राडारोड हटविण्यासाठी प्रतिष्ठानच्या साधकांनी किल्ले सज्जनगडच्या समर्थांच्या पायरी मार्गावरील श्रमदान करण्याचा निर्णय घेतला.

डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा ता.अलिबाग जि.रायगड यांच्यावतीने पदमश्री सन्मानित महाराष्ट्रभूषण डॉ.श्री आप्पासाहेब धर्माधिकारी,रायगडभूषण डॉ. .सचिनदादा धर्माधिकारी, श्री.उमेशदादा धर्माधिकारी, श्री.राहुल दादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली वडूज, पुसेगाव, कोरेगाव , नांदगाव,सातारा यासंह जिल्ह्यातुन विविध ठिकाणाहून आलेल्या प्रतिष्ठानच्या ९५ सदस्यांनी अवघ्या दोन तासात दुपारी दोन ते चार या वेळेत काम पुर्ण केले. साधकांनी तात्काळ श्रमदान करून हे समर्थ कार्य केल्यामुळे दुर्गप्रेमी शिवप्रेमी कडून डॉक्टर नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या साधकांचे कौतुक होत आहे उपासने बरोबरच श्रमदान हे त्यांचे ब्रीदवाक्य खरे करीत आहे त अशा प्रतिक्रिया शिवप्रेमी कडून येऊ लागल्या आहेत.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, साताराासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहुपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, साताराासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ करणारा उपक्रम : देसाई

शंभूराज देसाई ; जिल्हा परिषदेतील शाळेंमधील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ करणारा उपक्रम

सातारा : माझी शाळा आदर्श शाळा हा उपक्रम जिल्हा परिषदेतील शाळेंमधील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ करणारा आहे. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी लोकप्रतिनिधी, सरपंच, उपसरपंच, शाळा समितीचे सदस्य, ग्रामस्थ यांनी सहकार्य करून हा उपक्रम जिल्ह्यात यशस्वी करावा, असे आवाहन पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी केले.

जिल्हा परिषदेच्या माझी शाळा आदर्श शाळा उपक्रमांतर्गत स्व. यशवंतराव सभागृहात कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला कृष्णा विकास महामंडळाचे उपाध्यक्ष महेश शिंदे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक समीर शेख आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री देसाई म्हणाले, माझी शाळा आदर्श शाळा या उपक्रमाला जिल्हा वार्षिक योजनेतून १०० कोटींचा निधी दिला आहे. असा निधी देणारा सातारा जिल्हा प्रथम क्रमांकावर आहे. मागील वर्षी ५० शाळांची निवड करण्यात आली होती. आता जिल्ह्यातील २२३ शाळा आदर्श शाळा करण्यात येणार आहे. या शाळेचे काम मुदतीत पूर्ण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. शाळेच्या विकासात शिक्षक, ग्रामपंचायत व ग्रामस्थांचा सहभाग महत्वाचा आहे. या सर्वांनी या शाळांना सहकार्य करावे. या उपक्रमामुळे शैक्षणिक गुणवत्तेबरोबर शाळेचा पट देखील वाढणार आहे. या उपक्रमासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी सहकार्य केले आहे. या उपक्रमात सर्वांचा सहभाग महत्त्वाचे असल्याचेही पालकमंत्री श्री.देसाई यांनी यावेळी सांगितले.कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष महेश शिंदे म्हणाले, प्रशासनाचे पालकमंत्री महोदयांच्या नेतृत्वाखाली आदर्शवत काम चालू आहे. संस्कारक्षम पिढी घालवण्यासाठी आदर्श कुटुंबाची संस्काराची शिकवण शाळेमध्ये द्यावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी जिल्हाधिकारी डुडी म्हणाले, माझी शाळा आदर्श शाळा उपक्रमांतर्गत सुरुवातीला ५० शाळांचा समावेश करण्यात आला होता. आता या उपक्रमाची व्याप्ती वाढवली असून या अंतर्गत २२३ शाळा निर्माण करण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी ग्रामपंचायतीचा मोलाचा सहभाग असणार आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीच्या बैठकांमध्ये माझी शाळा आदर्श शाळा उपक्रमाचा आढावा घेण्यात यावा. जिल्हा वार्षिक योजनेतून १०० कोटींचा निधी देण्यात आला आहे. ग्रामपंचायतींनीही पंधरावे वित्त आयोगातून या शाळेसाठी निधी खर्च करावा. शाळेतील सोयी सुविधा वाढवण्यासाठी ग्रामस्थ, गावातील नागरिकांबरोबरच बाहेरगावी गावात राहणारे गावातील उद्योजक व्यावसायिक यांचीही मदत घ्यावी. सातारा जिल्हा हा क्रांतीकारांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो शिक्षण क्षेत्रातही आपण या उपक्रमांतर्गत क्रांती घडवून आणू, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. प्रास्ताविकात मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नागराजन म्हणाल्या, माझी शाळा आदर्श शाळा उपक्रमांतर्गत २२३ शाळा तयार करण्यात येणार आहे. या शाळांमध्ये भौतिक सुविधा वाढवण्यावर भर देण्यात येत आहे. पटसंख्या व शाळेचे कार्यक्षेत्र यावर शाळेची निवड करण्यात आली आहे. शाळांनी मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना अंतर्गत संगणक शिक्षकाची नियुक्ती करावी. या संगणक शिक्षकांचे पगार शासन करणार असल्याचे सांगून त्यांनी माझी शाळा आदर्श शाळा उपक्रमाची सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

यावेळी आनंददायी अभ्यासक्रम या पुस्तिकेचे तसेच शैक्षणिक दिनदर्शिकेचे व शिक्षक मार्गदर्शिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये करण्यात येणार आहे. तसेच २०२३-२४ मध्ये मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानांतर्गत शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्था तसेच इतर व्यवस्थापनांच्या शाळांमधील जिल्हास्तरावर प्रथम तीन क्रमांक प्राप्त शाळांना बक्षीस वितरणही करण्यात आले. या कार्यशाळेत शिक्षणाधिकारी प्राथमिक शबनम मुजावर, शिक्षणाधिकारी माध्यमिक प्रभावती कोळेकर यांच्यासह विविध गावचे सरपंच उपसरपंच शाळा समितीचे अध्यक्ष मुख्याध्यापक शिक्षक उपस्थित होते.

सातारा : खेड येथील सरपंच लता फरांदे व सहकारी यांच्या आंदोलनास पाठींबा देताना आ. महेश शिंदे व इतर.

खेडच्या आंदोलनास आ. महेश शिंदेचा पाठींबा

सातारा : सातारा शहरानजिकच्या खेड ग्रामपंचायतीमध्ये विकासकामे मंजूर असूनही कामे पूर्ण करण्यासाठी साहिल अकबर शेख हा युवक अडथळा निर्माण करत आहे. यामुळे खेडचे सरपंच लता फरांदे, उपसरपंच सुधीर काकडे, सदस्य यांनी झेडपी कार्यालयासमोर शुक्रवारपासून ठिय्या आंदोलन सुरु केले आहे. याबाबत प्रशासनाने अजूनही गांभीर्याने दखल न घेतल्याने आ. महेश शिंदे यांनी ठिय्या आंदोलनाच्या ठिकाणी जावून पाठींबा दिला. दरम्यान, जिल्हा प्रशासनाची आ. महेश शिंदेंनी कानउघडणी केली.

यावेळी कराड उत्तरचे भाजपचे नेते मनोज घोरपडे, माजी नगरसेवक विजय काटवटे, माजी झेडपी सदस्य संदीप शिंदे, उपसरपंच सुधीर काकडे, ग्रामपंचायत सदस्य विनोद माने, कांतीलाल कांबळे, गणेश पालखे, सुनील जाधव आदी उपस्थित होते.

आ. महेश शिंदे हे सोमवारी सकाळी आंदोलनस्थळी येताच झेडपीचे प्रशासनही आले. यावेळी खेड ग्रामपंचायतीच्या मुळ प्रश्नावरुन प्रशासनास चांगलेच धारेवर धरले. यावेळी संबंधित जागेचानकाशा हाती घेत हा प्रमुख जिल्हामार्ग आहे, त्या गटात संबंधिताचा बंगला आहे. हा तुम्ही खुला करुन देत नाही, अन गटाराचे पाणी जावू देत नाही, ही बाब निश्चितच खेदजनक आहे. ज्या माणसाने प्रजिमावर बंगला बांधला आहे. अन तेथून पुढील रेल्वेने आरक्षीत केलेली जमिन आहे. मग तुम्ही त्याला आजपर्यंत का विचारले नाही? आज आम्ही तुमच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करु शकतो. या अपार्टमेंटचे बांधकाम गेल्या वीस वर्षापूर्वी झाले आहे. मग त्याचे सांडपाणी तिथेच मुरते आहे. शोषखड्डयावर तुमचे प्रशासन कशी परवानगी देत आहे. ग्रामविकास विभाग म्हणुन तुमची जबाबदारी आहे का नाही? अशा अनेक प्रश्नांची सरबत्ती यावेळी आ. महेश शिंदे यांनी प्रशासनास केली.

साताऱ्यात काँग्रेसचे जोडे मारो आंदोलन

सातारा : राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी काँग्रेसने जोडे मारो आंदोलन केले. यावेळी पदाधिकाऱ्यांनी जोरदार घोषणाबाजीही केली. तसेच राज्य सरकारचा निषेधही करण्यात आला.

मागील काही दिवसांपूर्वी राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला. यामुळे महाविकास आघाडीच्यावतीने राज्यात आंदोलन करण्यात येत आहे. सातारा येथेही राष्ट्रीय काँग्रेसने जोडे मारो आंदोलन केले. जिल्हाध्यक्ष डॉ. सुरेश जाधव यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन झाले. आंदोलनात काँग्रेसच्या महिला जिल्हाध्यक्षा अल्पना यादव, जिल्हा सरचिटणीस नरेश देसाई, अन्वर पाशा खान, संदीप माने, रजनी पवार, धनश्री महाडिक, जगन्नाथ कुंभार, अरबाज शेख आदी सहभागी झाले होते. जिल्हा काँग्रेस कमिटीसमोर हे आंदोलन करण्यात आले.

यावेळी पदाधिकाऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. तर जिल्हाध्यक्ष डॉ. जाधव म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळणे दुर्दैवी घटना आहे. महायुती सरकाराचा कारभार याला कारणीभूत आहे. त्यामुळे या सरकारला सत्तेवर राहण्याचा नैतिक अधिकार नाही. येणाऱ्या निवडणुकीत महायुती सरकारला जनता धडा शिकविल्याशिवाय राहणार नाही.

गुलालवाल्या खासदारांनी विकासकामात अडथळा आणू नये

कोरेगाव : लोकसभेच्या निवडणुकीत ज्यांना आपण निवडून आलोय की पडलोय हेच कळाले नाही .खुशाल गुलाल घेवून आपण खासदार झाल्याचा आनंदोत्सव कार्यकर्त्यांबरोबर साजरा करत होते. आशा या गुलालवाल्या खासदारानी विकासकामात अडथळा आणू नये असा खोचक टोला कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष ना.महेश शिंदे यांनी आ.शशिकांत शिंदे यांचा नामोल्लेख टाळत लगावला.

धुमाळवाडी(नांदगिरी), ता.कोरेगाव येथे नांदगिरी ते खडखडवाडी सिमेंट ट्रीमीक्स रस्त्याचे तसेच बंदिस्त गटरच्या १कोटी ७५ लाख रुपयांच्या विकासकामाचे भुमिपूजन ना. महेश शिंदे यांच्या हस्ते झाला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सरपंच रेश्मा कदम, उपसरपंच शबाना दफेदार यांची प्रमुख उपस्थिती होती.

ना.महेश शिंदे आपल्या नेहमीच्या शैलीत आ. शशिकांत शिंदे यांच्यावर टीका करताना म्हणाले, गेल्या दहा वर्षात आमदार असताना त्यांना कोरेगावचा विकास करता आला नाही. लोकसभेच्या निवडणूकीचा निकाल आला नाही तोपर्यंत ह्यांनी गुलाल घेणे सुरू केले होते आपण निवडून आलोत की नाही हेच त्यांना माहीत नव्हते आपल खुशाल गुलाल घेऊन आपन खासदार झाल्याचा आनंदोत्सव साजरा करत होते आशा या गुलालवाल्या खासदारांनी किमान कोरेगावच्या विकासकामामध्ये अडथळा आणू नये असा इशारा दिला.

राज्य सरकारने घेतलेल्या लाडकी बहीण योजनेचा फायदा घेण्यासाठी आमचे विरोधक पुढे येत आहेत परंतु याचा अपप्रचारही हेच लोक करत आहेत. या योजनेचा फायदा आज कोट्यवधी महिलांना झाला आहे. परंतु गावातील एखादी उंडगी बाई चहाड्या लावून चांगले काम बिघडवण्याचे काम करत असते त्याचप्रमाणे लाडकी बहीण योजनेच्या विरोधात विरोधक अफवा पसरवत आहेत. अशी प्रखर टीकाही ना. महेश शिंदे यांनी यावेळी केली.

ज्या ठिकाणी पाऊलही टाकता येत नव्हते आशा परिसराचा विकास आज झाला आहे. आपण खोट बोलत नाही दिलेला शब्द पाळणार आपण लोकप्रतिनिधी आहे. आज कोरेगाव मतदारसंघात कोट्यवधी रुपयांची कामे होत असताना विरोधकांच्या मात्र पोटात दुखत आहे. आपल्या कार्यकर्त्यांच्या मार्फत विकासकामात अडथळा आणण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. परंतु कितीही अडथळे निर्माण केले तरी आपण कोरेगावचा मतदारसंघाचा विकास केल्याशिवाय शांत बसणार नाही. नांदगीरीबरोबरच खेड, आंबवडे, बर्गेवाडी, विठ्ठलवाडी येथे झालेल्या विकासकामांचा त्यांनी आढावा घेतला.

कार्यक्रमास सचिन कदम, शकील दफेदार, युवराज कदम, कृष्णात कदम, सुशांत भोसले, संदीप बाबर, पप्पू शिंदे, विकास मोरे,शिवाजी साळुंखे, शिवाजी बर्गे उपस्थित होते.

वीणा काशिद यांची विद्युत निर्देशक पदी निवड

सातारा : जिल्ह्यातील ट्रान्सवुमन वीणा काशीद यांची व्यवसाय तंत्रशिक्षण विभाग, पुणे येथे विद्युत निर्देशक पदी निवड झाली आहे. या पदावर निवड होणाऱ्या त्या जिल्ह्यातील पहिल्या ट्रान्स वुमन आहेत. समाजात वावरताना त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला, तरीही प्रतिकुल परीस्थितीवर मात करीत, त्या शासन सेवेत दाखल झाल्या आहेत. त्यांचा सत्कार करण्यात आला. वीणा यांचा आदर्श घेऊन हुशार, होतकरु तृतीयपंथीयांनी महाराष्ट्र शासनाच्या सेवेत निवड होण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन सहायक आयुक्त समाजकल्याण नितीन उबाळे यांनी केले आहे.

शालेय कुस्ती स्पर्धेमध्ये श्री कोल्हेश्वर विद्यालयाचे उज्ज्वल यश

कोरेगाव : महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेमध्ये श्री चौंडेश्वरी एज्युकेशन सोसायटी रहिमतपूर संचलित श्री कोल्हेश्वर विद्यालय तांदुळवाडी मुंगळापूर या विद्यालयाने तालुकास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेमध्ये उज्वल यश संपादन केले.

डी.पी. भोसले कॉलेज कोरेगाव येथे संपन्न झालेल्या कुस्तीच्या १७ वर्षाखालील मुलींच्या वजनी गटांमध्ये सुहानी मुंढे हिने ४० किलो वजनी गटात प्रथम क्रमांक राजलक्ष्मी घोरपडे हिने ४३ किलो वजनी गटांमध्ये प्रथम क्रमांक, जोशना शितोळे हिने ४६ किलो वजनी गटामध्ये प्रथम क्रमांक ,श्रुती जाधव हिने ६९ किलो वजनी गटामध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केला.तर १४ वर्षाखालील कुस्ती स्पर्धेमध्ये सायली मुंढे हिने ५४ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक प्राप्त केला. या सर्व मुलींची जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

१७ वर्षाखालील कुस्ती स्पर्धेत आकांक्षा जाधव हिने ४९ किलो गटात, अनुष्का बुरुकले हिने ५४ किलो गटात द्वितीय क्रमांक प्राप्त केला. १४ वर्षाखालील मुलींमध्ये शिवानी मुंढे हिने ३० किलो गटात,सिद्धी वेदपाठक हिने ४२ किलो गटात द्वितीय क्रमांक प्राप्त केला. १४ वर्षाखालील मुलांच्या कुस्ती स्पर्धेमध्ये रुद्र शिंदे याने ३८ किलो वजनी गटात ,रोहन मतकर याने ४४ किलो वजनी गटामध्ये व शिवम शिंदे याने ४८ किलो वजनी गटामध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त केला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना विद्यालयाचे क्रीडा मार्गदर्शक संतोष राऊत व मुख्याध्यापक सत्यवान शिर्के यांचे मार्गदर्शन लाभले.सर्व विजयी स्पर्धकांचे श्री चौंडेश्वरी एज्युकेशन सोसायटी रहिमतपूर व श्री कोल्हेश्वर विद्यालय तांदुळवाडी -मंगळापूर ग्रामस्थ,पालक, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्यावतीने खूप खूप अभिनंदन करण्यात आले.

मनसेची गाव तिथे शाखा उपक्रम राबवणार : पाटील

गोंदवले : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गाव तिथे शाखा काढून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची ताकद वाढवण्याचा निर्धार महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांनी केला आहे.

सातारा जिल्ह्यात पक्ष वाढीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा प्रयत्न सुरू आहे.गेल्या महिन्यात वरिष्ठ नेत्यांच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार पक्ष प्रमुख राज ठाकरे यांच्या आदेशाने आगामी विधानसभा निवडणूक लढविण्याचे संकेत मिळाले होते.याच पार्श्वभूमीवर माण-खटाव सह आता इतर तालुक्यातही पक्षाचा अजेंडा पोचवण्यात येणार आहे.त्यासाठी गावोगावी मनसेच्या शाखा सुरू करण्याचा निर्धार जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांनी केला आहे.

पक्ष कार्यालयात आज कार्यकर्त्यांचा पक्ष प्रवेश तसेच नूतन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. यावेळी मनसेच्या फलटण तालुकाध्यक्षपदी किसनराव काशीद याना पाटील यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. तसेच इतर पदाधिकाऱ्यांच्याही निवडी करण्यात आल्या. यावेळी मनसे उपजिल्हाध्यक्ष सचिन पवार, जिल्हा संघटक सुरज पवार, खटाव तालुकाध्यक्ष दिगंबर शिंगाडे, विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष सागर कट्टे, रणजित पडमलकर,राजू जाधव, राहुल काटकर, अभिजीत साळुंखे, लखन पारसे, विश्वराज कट्टे, धनराज जाधव, आमित दुरगुडे, भास्कर कर्वे, मयुर जाधव, राहुल गायकवाड, शुभम भालके, नितीन जाधव, गणेश रणवरे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

गणेश मंडळांनी धर्मदाय आयुक्त यांचेकडे नोंदणी व पोलीस परवाना घेणे बंधनकारक

वर्गणीच्या नावाखाली सक्तीने वाहने अडवून नये

सातारा : रहिमतपूर पोलीस ठाणे अंतर्गत असणाऱ्या रहिमतपूर शहरासह ३८ गाव,वाडी वस्तीमध्ये गणेश उत्सव कालावधीमध्ये वर्गणी गोळा करण्याच्या नावाखाली सक्तीने वाहने अडवून अथवा नागरिकांवर जबरदस्ती करून वर्गणी गोळा करू नये. तसेच गणपती स्थापनेपूर्वीच सर्व गणेश मंडळांनी धर्मदाय आयुक्त यांचेकडे नोंदणी व पोलीस परवाना घेणे बंधनकारक असल्याचे प्रतिपादन रहिमतपूरचे पोलीस सहाय्यक निरीक्षक सचिन कांडगे यांनी केले.

रहिमतपूर पोलीस ठाणे हद्दीतील पोलीस पाटील व गणेशोत्सव साजरा करणाऱ्या मंडळांची संयुक्त मीटिंग घेण्यात आली. त्यामध्ये गणेश उत्सव दरम्यान शासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करणेबाबत सूचना देण्यात आल्या. तसेच गणेशोत्सव साजरा करणारे मंडळ यांना येणाऱ्या अडीअडचणी संदर्भात मंडळाचे अध्यक्ष व पदाधिकारी यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी मंडळाचे अध्यक्ष उपाध्यक्ष असे १७० ते २०० कार्यकर्ते उपस्थित होते.

सपोनि सचिन घाडगे म्हणाले की, श्रींची मूर्ती स्थापना व आरास संदर्भात गणेश मंडळाने आपले मंडळ धर्मदाय आयुक्त यांचेकडे नोंदणी करुन घेणे आवश्यक असणार आहे. सार्वजनिक गणपती मंडप बांधण्यापूर्वी गणेशोत्सव परवाना प्राप्त करणे बंधनकारक असून सर्व मंडळांनी पोलीस परवाना घेणे बंधनकारक असणार आहे. उपस्थित सार्वजनिक गणपती मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना वर्गणी सक्तीने अगर वाहने अडवून जमा न करण्याचे आवाहन केले. तसेच मंडप व गणपती स्थापनेचे आसन मजबूत असावे. तसेच श्री मूर्तीचे पाऊस व आगीपासून संरक्षणाची काळजी घ्यावी. सजावटीमध्ये हॅलोजेन सारखे प्रखर दिवे लावण्याचे टाळावेत. प्रेक्षक, सुरक्षा रक्षक यांच्या डोळ्यावर प्रखर प्रकाश पडणार नाही याची दक्षता घ्यावी.रोषणाई आणि विद्युतीकरणाचे काम प्रशिक्षित वायरमनकडून करून घ्यावे. विद्युत प्रवाह खंडित झाल्यास जनरेटर असावे.

उत्सवामध्ये किंवा मिरवणुकीत देखव्या संदर्भात पोलिसांना माहिती द्यावी.संपूर्ण उत्सव काळात मंडळाच्या ठिकाणी होणाऱ्या कार्यक्रमाची यादी आणि रूपरेषा पोलिसांना आगाऊ कळविणे. ध्वनिक्षेपकाचा वापर सर्वोच्च न्यायलायकडून ठरवून दिलेल्या अटीनुसार असाव्यात. श्रींची मूर्ती किंवा सजावटीची देखभाल करण्यासाठी मंडळाचे ५ कार्यकर्ते अथवा सुरक्षा रक्षक २४ तास मंडपात नेमावे.आगीची दुर्घटना होणार नाही याची दक्षता घ्यावी.करमणुकीचे कार्यक्रम पाहण्यासाठी मंडपासमोर योग्य दोर लावून ठेवाव्यात.

योजनांना अडथळा आणण्याचा विरोधकांचा केविलवाणा प्रयत्न : ना. पवार

फलटण : महाराष्ट्र हे कल्याणकारी राज्य असून येथील जनतेला मूलभूत सुविधा देण्याबरोबर त्यांच्या अपेक्षा, गरजा पूर्ण करण्यासाठी आम्ही विविध योजना प्रभावीपणे राबविण्याचा यशस्वी प्रयत्न करीत असताना विरोधक त्यावर टीका टिप्पणी करुन अडथळा आणण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत आहेत, तथापि त्याकडे दुर्लक्ष करुन राज्यातील महायुतीचे सरकार कल्याणकारी राज्य ही संकल्पना पुढे नेण्यात यशस्वी झाल्याची ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष ना. अजित पवार यांनी दिली आहे.

जन सन्मान योजनेचे स्वागत आणि महिला मेळावा अशा संयुक्त कार्यक्रमात मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री ना. अजित पवार बोलत होते. यावेळी महाराष्ट्र विधान परिषद माजी सभापती आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर, राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष खा. सुनिल तटकरे, आ. दिपक

महिला आघाडीच्या राज्याध्यक्षा रुपाली चाकणकर, जिल्हाध्यक्ष श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर, मुंबई बाजार समितीचे माजी चेअरमन बाळासाहेब सोळसकर यांच्यासह अनेक मान्यवर आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

रस्ते, पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण वगैरे विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीद्वारे मूलभूत सुविधा यासाठी तर महायुतीचे सरकार कोठेच कमी पडणार नाही तथापि त्यापलीकडे जाऊन लोकांच्या अपेक्षा, अडचणी सोडविण्यासाठी या राज्यात शेती पंपांसाठी दिवसा योग्य दाबाने अखंडित वीज पुरवठा, शेतकरी सन्मान योजनेद्वारे काही तरतुदी, लाडकी बहिण सारख्या महिलांना आधार देणारी योजना, मुलींना मोफत शिक्षण यासारख्या अनेक योजना प्रभावीरीतीने राबविण्यात सर्व योजनांसाठी आर्थिक अडचण येऊ देणार नाही याची खात्री ना. अजित पवार यांनी स्पष्ट शब्दात दिली.

महाराष्ट्रात गेली अनेक वर्षे विविध खात्यांची जबाबदारी आपण समर्थपणे सांभाळताना लोकांच्या अपेक्षा, अडचणी यांचा बारकाईने अभ्यास केला असल्याने सबंधीत विभागाचा मंत्री म्हणून आपण अनेक योजना प्रभावीपणे राबविल्याचे निदर्शनास आणून देताना संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान, रोजगार हमी योजना, लाडकी बहिण, किंवा शेती पंपांना दिवसा वीज पुरवठा ही अनेक वर्षांची मागणी पूर्ण करण्यासाठी सौर ऊर्जा योजना तयार करुन त्यासाठी २४ हजार कोटी रुपयांची तरतूद केल्याने ती यशस्वी होत आहे, अशा असंख्य योजनांना मिळणारा लोकांचा प्रतिसाद पाहिल्यानंतर आपल्याला समाधान वाटते आणि त्या योजना अधिक प्रभावी रीतीने राबवून जास्तीत जास्त लोकांना त्याचा लाभ मिळाला पाहिजे यासाठी आम्हा सर्वांचा प्रयत्न

ड्रोन हालचालीबाबत जागृत राहण्याचे आवाहन

वडूज : खटाव तालुक्यातील भाग्यनगर (बोंबाळे) गावच्या हद्दीत रात्रीच्या वेळी ड्रोन च्या घिरट्या वाढल्या आहेत. याबाबत ग्रामस्थानी जागृत राहवे असे आवाहन पोलीस पाटील सौ. अर्चना महादेव हजारे यांनी केले आहे.

बोंबाळे परिसरात सलग तीन दिवस रात्री दहा ते एक वेळेत दोनतीन ड्रोन घिरट्या घालत आहेत. याबाबत प्रशासकीय पातळीवर योग्य खुलासा होत नाही. त्यामुळे चोरीसारखे सारखे प्रकार घडू नये यासाठी ग्रामस्थानी जागृत राहवे. तसेच संशयित हालचाली जाणवल्यास वडूज पोलीस ठाणे अथवा पोलीस पाटील यांच्याशी संपर्क साधवा आहे असे आवाहनही त्यांनी केले आहे.

कोल्हापूरच्या 'समरा'त पवारांची 'जीत', घाटगेंच्या प्रवेशामुळे मुश्रीफांसमोर आव्हान

राजदंड/कोल्हापूर : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांतील संघर्ष अधिक प्रखर होत चालला असून समरजित घाटगे यांच्या प्रवेशामुळे कोल्हापुरात शरद पवार गटाने सरशी साधली आहे. जिल्ह्यातील अजित पवार गटाचे दोन मातब्बर नेतेही महाविकास आघाडीतील पक्षांशी संधान साधून आहेत. भाजपचे माजी ग्रामीण जिल्हाध्यक्ष असलेल्या घाटगे यांच्या पक्षांतराची झळ भाजपला बसली असली तरी, त्याचा मोठा फटका अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला बसण्याची शक्यता आहे.

कोल्हापूर जिल्ह्याचे राजकीय विद्यापीठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कागल मतदारसंघातील राजकारणाचा पोत आमूलाग्र बदलला आहे. एकेकाळी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचे अत्यंत जवळचे, एकनिष्ठ असलेले हसन मुश्रीफ यांनी राष्ट्रवादीच्या फुटीनंतर अजित पवारांची

साथ धरली. त्यानंतर अजित पवारांनीही कागल विधानसभेसाठी मुश्रीफ यांची उमेदवारी जाहीर करून टाकली. तेव्हापासूनच मुश्रीफ यांचे पारंपरिक राजकीय प्रतिस्पर्धी असलेले भाजपचे माजी ग्रामीण जिल्हाध्यक्ष समरजित घाटगे हे अस्वस्थ होते. त्यांची अस्वस्थता हेरून शरद पवार यांनी त्यांना आपल्या गोटात खेचून आणले. यातूनच सोमवारी शरद पवार यांच्या उपस्थितीमध्ये घाटगे यांचा राष्ट्रवादीत प्रवेश झाला असून तो जिल्ह्याच्या राजकारणाला नवे वळण देणारा ठरला आहे. घाटगे यांच्या पक्षप्रवेशाच्या निमित्ताने कागलमध्ये मेळावा घेऊन पवार यांनी मुश्रीफ यांच्याविरोधात दंड थोपटले आहेत. मुश्रीफ यांच्याविरोधात घाटगे यांना उमेदवारी मिळणे निश्चित असून महाविकास आघाडीची मोठी ताकद त्यांच्यामागे असल्याने गतवेळेपेक्षा यंदा मुश्रीफ यांना तगडे आव्हान मिळण्याची शक्यता आहे. अन्य मतदारसंघांतही फायदा घाटगे हे भाजपातून महाविकास आघाडीत आल्याने आघाडी अंतर्गत राजकीय मैत्रीची समीकरणे भक्कम होणार आहेत. अनेक मतदारसंघात हे साटेलोटे एकमेकांच्या पथ्यावर पडणार आहे. कोल्हापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघात जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सतेज पाटील यांचे पुतणे आमदार ऋतुराज पाटील हे दुसऱ्यांदा निवडणूक लढवतील. या मतदारसंघा मतदारसंघातील अनेक गावे घाटगे यांच्या शाहू साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात येत असतात. कागल उत्तर भागात पाटील यांचा राजकीय प्रभाव आहे. त्यामुळे घाटगे - पाटील या दोघांना एकमेकांची मदत पुरक ठरेल.

कागल विधानसभा मतदारसंघात गडहिंग्लज तालुक्याचा बराचसा भाग आहे. गडहिंग्लज तालुक्यातील दोन्ही दिवंगत आमदारांच्या कन्यांच्या राजकीय प्रभावाचा फायदा घाटगे यांना होऊ शकतो. प्रदेश जनता दलाचे दिवंगत अध्यक्ष माजी आमदार श्रीपतराव शिंदे यांच्या कन्या, माजी नगराध्यक्ष स्वाती कोरी तसेच विधानसभेचे माजी अध्यक्ष बाबा कुपेकर यांच्या कन्या नंदिनी बाभुळकर यांची मदत घाटगे यांना महत्वाची ठरू शकेल.

दोन पाटीलही मविआच्या वाटेवर

कागलला लागून असलेल्या राधानगरी या मतदारसंघात अजित पवार गटाबरोबर गेलेले माजी आमदार के. पी. पाटील यांनी आता परतीची वाट सुकर करून घेतली आहे. आपण अजित पवार गटात गेलोच नव्हतो, असे सांगत ते ठाकरे गटाच्या माध्यमातून महाविकास आघाडीतून लढू इच्छित आहेत. त्यांचे मेहुणे आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष ए. वाय. पाटील यांनी रितसर काँग्रेस पक्षात प्रवेश करून उमेदवारीसाठी प्रयत्न चालवले आहेत.

उजनी धरणाचे पाणी अखेर कुरनूर धरणात पोहोचले

दक्षिण सोलापूर तालुक्यातील ७२ गावांना होणार लाभ

राजदंड /सोलापूर : : सोलापूर जिल्ह्यासाठी वरदान ठरलेल्या उजनी धरणात शंभर टक्के पाणीसाठा झाल्यामुळे धरणातून भीमा नदीच्या पात्रासह कालव्यावाटे पाणी सोडणे सुरूच आहे. धरणातील पाण्याने जिल्ह्यात सर्व तलाव, बंधारे आणि मध्यम प्रकल्प भरून घेतले जात आहेत. त्याचाच भाग म्हणून उजनीतून सोडलेले पाणी अक्कलकोट आणि दक्षिण सोलापूरसाठी कुरनूर धरणात पोहोचले आहे. त्यामुळे दोन्ही तालुक्यांतील ७२ गावांना पाणी मिळणार आहे. यातून १७ हजार ३१० हेक्टर क्षेत्रात शेतीचे सिंचन होणार आहे.

तथापि, उजनी धरणाचे पाणी अक्कलकोट आणि दक्षिण सोलापूर तालुक्यात मिळण्याची अनेक वर्षापासूनची मागणी आहे. या प्रश्नावर विधानसभेच्या अनेक निवडणुका लढल्या गेल्या. अलीकडे उपसा सिंचन योजना टप्प्याटप्प्याने मार्गी लागल्यानंतर उजनीचे पाणी मिळविण्यावरून राजकीय नेत्यांमध्ये श्रेयवादाचे राजकारण सुरू झाले आहे. त्यास आता आगामी विधानसभा निवडणुकीची किनार लाभली आहे. अक्कलकोटचे भाजपचे आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि त्यांचे प्रतिस्पर्धी काँग्रेसचे माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्यात उजनीच्या पाण्याचे राजकारण पुन्हा समोर आले आहे.

उजनी धरणाचे पाणी अक्कलकोट व दक्षिण सोलापूरला मिळण्यासाठी प्रथम एकरूख उपसा सिंचन योजनेवाटे एकरूख तलावात सोडण्यात आले आहे. हे पाणी पुढे रामपूर तलाव व अन्य मार्गाने मजल दर मजल करीत अक्कलकोट तालुक्यातील कुरनूर धरणात पोहोचले आहे. हे धरण सुमारे ८० टक्के भरून घेतले जाणार आहे.अक्कलकोट तालुक्यातील ५१ तर दक्षिण सोलापूर तालुक्यातील २१ गावांना या पाण्याचा लाभ मिळणार आहे. मागील वर्षी उजनीचे पाणी अक्कलकोट आणि दक्षिण सोलापूर तालुक्याला मिळण्यासाठी शेतकऱ्यांचे आंदोलन झाले होते.

'लाडकी बहीण'वरुन प्रणिती शिंदेंचा सरकारला टोला

महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक या वर्षी होणार आहे. या निवडणुकीची तारीख अद्याप जाहीर झालेली नाही तरीही दिवाळीनंतर निवडणूक लागेल अशी चिन्हं आहेत. महाविकास आघाडी विरुद्ध महायुती असा सामना यावेळी रंगणार आहे. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे ३० खासदार निवडून आले त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास दुणावला आहे. तर महायुतीचा महाराष्ट्रात जो पराभव झाला त्यामुळे त्यांनीही विधानसभा जिंकण्यासाठी कंबर कसली आहे. या सगळ्या धामधुमीत एका योजनेची चर्चा रंगली आहे. ती योजना म्हणजे लाडकी बहीण योजना.

लाडकी बहीण योजना चर्चेत

लाडकी बहीण योजना निवडणुकीपुरती आहे, निवडणूक झाल्यानंतर ही योजना महायुती सरकार आलं तर ते बंद करेल असं महाविकास आघाडीचे नेते जाहीरपणे सांगत आहेत. तर दुसरीकडे सावत्र भावांपासून सावध राहा असा टोला महायुतीचे नेते मविआला लगावत आहेत. ही योजना पुन्हा चर्चेत येण्याचं कारण आहेत खासदार प्रणिती शिंदे. प्रणिती शिंदेंनी एक जोक सांगून या योजनेवरुन सरकारची फिरकी घेतली आहे.

प्रणिती शिंदे काय म्हणाल्या?

प्रणिती शिंदे म्हणाल्या की, बाळासाहेब थोरात यांच्या शब्दापुढे मी जाऊ शकत नाही. संगमनेरला आल्यावर घरी आल्यासारखं वाटतं. सोलापूर माझं गाव असलं तरी संगमनेर माझ्यासाठी घरच आहे. मी आमदार, खासदार झाले मात्र महिलांसाठी एवढा मोठा कार्यक्रम मी सुद्धा करू शकले नाही. गृहिणी खूप हुशार आहेत. मात्र त्यांच्या उत्पादनांना मार्केट आता उभे राहिले आहे. महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. महिला एकत्रित आल्या तर शक्तीपीठ निर्माण होतं, असं प्रणिती शिंदे म्हणाल्या.

लाडकी बहीण योजनेवरुन प्रणिती शिंदेंनी टोला लगावला आहे. त्या म्हणाल्या, नवरा सगळा पगार देतो, त्याचं बायका ऐकत नाहीत. तर यांचं कोण ऐकणार? हा प्रश्न विचारत लाडकी बहीण योजनेवरुन प्रणिती शिंदेंनी महायुती सरकारला टोला लगावला आहे.

शासकीय योजनाच्या माध्यमातून घरोघरी पोहचा : खासदार डॉ. श्रीकांत शिंदे

कोल्हापूर : लोकसभेचा पूर्वानुभव पाहता विरोधकांकडून घरोघरी जाऊन खोटा अपप्रचार करण्यात आला. पण आता गाफिल न राहता लाडकी बहिण, अन्नपूर्णा अशा लोकहिताच्या योजनेतून घरोघरी पोहचून शिवसेनेचे काम पोहचवा, अशा सूचना शिवसेना संसदिय नेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी दिल्या.

जनसंवाद दौऱ्याच्या निमित्ताने कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदार संघाचा आढावा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी घेतला. जैन बोर्डिंग येथील बैठकीत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी शिवसेना पदाधिकारी व शिवसैनकांशी संवाद साधला.

यावेळी बोलताना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी, मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेच्या यशस्वी अंमलबजावणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची लोकप्रियता वाढली आहे. त्याची धास्ती विरोधकांनी घेतली आहे. त्यामुळे लोकसभेप्रमाणे खोटा अपप्रचार करण्याचा डाव या विधानसभा निवडणूकित विरोधकांकडून केला जाऊ शकतो. त्यामुळे गाफिल न राहता शासनाच्या योजनाच्या माध्यमातून घरोघरी पोहचा. जनसंवाद दौऱ्यामध्ये महिला भगिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे त्या लाभार्थी महिलांपर्यंत पोहचणे गरजेचे आहे. शिवसैनिकांसह खासकरून महिला आघाडी, युवती सेनेने हे काम तंतोतंत करावे. मतदार संघातील जनसंपर्क वाढवावा जेणेकरून विरोधकांचा अपप्रचार मतदारचं खोडून काढतील. त्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी कामाला लागा अशा सूचना दिल्या.

यावेळी बोलताना राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर यांनी, कोल्हापूर उत्तर शिवसेनेचा बालेकिल्ला असून, याठिकाणी फक्त धनुष्यबाण चालतो. लोकसभेला विरोधकांचे मताधिक्याला लगाम लावला. या विधानसभेला आम्ही गाफिल न राहता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनांचं पुन्हा मुख्यमंत्री होण्यासाठी कोल्हापूरातून आम्ही सज्ज राहू अशी ग्वाही दिली.

तासगाव बाजार समितीतील अपहारप्रकरणी गुन्हा दाखल करा

तासगाव : येथील राष्ट्रवादीच्या ताब्यात असणाऱ्या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये अपहार झाला आहे. १ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१ या कालावधी झालेल्या लेखापरीक्षणातून हा अपहार चव्हाट्यावर आहे आहे. याप्रकरणी संबंधितांवर गुन्हे दाखल करा, असे पत्र विशेष लेखापरीक्षक अनिल पैलवान यांनी तासगाव पोलिसांना दिले आहे. याप्रकरणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अमोल काळे यांनी गेल्या अनेक दिवसांपासून पाठपुरावा केला आहे. त्यांच्या पाठपुराव्याला यानिमित्ताने यश येताना दिसून येत आहे.

विशेष लेखापरीक्षक यांनी तासगाव पोलिसांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे, येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे १ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१ या कालावधीतील लेखापरिक्षण पूर्ण केले आहे. त्याचा लेखापरिक्षणचा अहवाल दि. ९ जानेवारी २०२४ रोजी सादर केला आहे.

या लेखापरीक्षणाअंती निदर्शनास आलेल्या अपहाराचा विशेष अहवाल वरिष्ठांना सादर करण्यात आला आहे. बाजार समितीमध्ये झालेला अपहार हा विस्तारीत बाजार समितीच्या बांधकामाच्या अनुषंगाने झाला आहे. तरी संबंधितावर गुन्हा दाखल करण्यात यावा.

खेडच्या आंदोलनास आ. महेश शिंदेचा पाठींबा

सातारा : सातारा शहरानजिकच्या खेड ग्रामपंचायतीमध्ये विकासकामे मंजूर असूनही कामे पूर्ण करण्यासाठी साहिल अकबर शेख हा युवक अडथळा निर्माण करत आहे. यामुळे खेडचे सरपंच लता फरांदे, उपसरपंच सुधीर काकडे, सदस्य यांनी झेडपी कार्यालयासमोर शुक्रवारपासून ठिय्या आंदोलन सुरु केले आहे. याबाबत प्रशासनाने अजूनही गांभीर्याने दखल न घेतल्याने आ. महेश शिंदे यांनी ठिय्या आंदोलनाच्या ठिकाणी जावून पाठींबा दिला. दरम्यान, जिल्हा प्रशासनाची आ. महेश शिंदेंनी कानउघडणी केली.

यावेळी कराड उत्तरचे भाजपचे नेते मनोज घोरपडे, माजी नगरसेवक विजय काटवटे, माजी झेडपी सदस्य संदीप शिंदे, उपसरपंच सुधीर काकडे, ग्रामपंचायत सदस्य विनोद माने, कांतीलाल कांबळे, गणेश पालखे, सुनील जाधव, आदी उपस्थित होते.

आ. महेश शिंदे हे सोमवारी सकाळी आंदोलनस्थळी येताच झेडपीचे प्रशासनही आले. यावेळी खेड ग्रामपंचायतीच्या मुळ प्रश्नावरुन प्रशासनास चांगलेच धारेवर धरले. यावेळी संबंधित जागेचानकाशा हाती घेत हा प्रमुख जिल्हामार्ग आहे, त्या गटात संबंधिताचा बंगला आहे. हा तुम्ही खुला करुन देत नाही, अन गटाराचे पाणी जावू देत नाही, ही बाब निश्चितच खेदजनक आहे. ज्या माणसाने प्रजिमावर बंगला बांधला आहे. अन तेथून पुढील रेल्वेने आरक्षीत केलेली जमिन आहे. मग तुम्ही त्याला आजपर्यंत का विचारले नाही? आज आम्ही तुमच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करु शकतो. या अपार्टमेंटचे बांधकाम गेल्या वीस वर्षापूर्वी झाले आहे. मग त्याचे सांडपाणी तिथेच मुरते आहे. शोषखड्डयावर तुमचे प्रशासन कशी परवानगी देत आहे. ग्रामविकास विभाग म्हणुन तुमची जबाबदारी आहे का नाही? अशा अनेक प्रश्नांची सरबत्ती यावेळी आ. महेश शिंदे यांनी प्रशासनास केली. त्यावर अधिकारी निरुत्तर झाले.

सरकारला संवेदना असतील तर, त्यांनी आजच एसटी कर्मचार्यांच्या मागण्यांवर बैठक घ्यावी : आ.सतेज पाटील

कोल्हापूर : एसटी कर्मचार्यांना राज्य सरकारी कर्मचार्यां प्रमाणं वेतन मिळावं या प्रमुख मागणीसह अन्य मागण्यां बाबत सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्यानं तेरा संघटनांचा सहभाग असलेल्या एसटी कर्मचारी संयुक्त कृती समितीनं आज पासून राज्यव्यापी धरणं आंदोलन सुरु केलंय. कोल्हापूरातील विभागीय कार्यालया समोर आज मंगळवार सकाळ पासून बेमुदत धरणं आंदोलन सुरु केलंय.या आंदोलनाला भेट देत आमदार सतेज पाटील यांनी एसटी कर्मचार्यांच्या मागण्यांना पाठींबा दिला.

यावेळी त्यांनी एसटी कर्मचार्यांच्या मागण्यां बाबत राज्य सरकार ठोस निर्णय घेत नसल्यानं कर्मचार्यांनी धरणं आंदोलन सुरु केलंय. गणेशोत्सवाच्या तोंडावर हे आंदोलन चिघळून प्रवाशांचे हाल होऊ नयेत यासाठी राज्य सरकारनं उद्या ऐवजी आजच्या आजच बैठक घेऊन संवेदनशीलता दाखवावी अशी म यावेळी राज्य एसटी कर्मचारी कृती समितीचे सदस्य आणि एसटी कर्मचारी काँग्रेसचे विभागीय सचिव संजीव चिकुर्डेकर यांनी सणासुदीच्या तोंडावर आंदोलन करणं एसटी कर्मचार्यांना सुध्दा योग्य वाटत नाही पण राज्य सरकारनंच आमच्या मागण्यांकडं दुर्लक्ष करत हे आंदोलन लादलं असल्याचं सांगितलं.मुख्यमंत्र्यांनी बैठकीसाठी उद्याची वेळ दिलीय पण आजच बैठक घेऊन त्यांनी आमच्या मागण्यांबाबत निर्णय घ्यावा अन्यथा राज्यभरातील एसटीची सेवा विस्कळीत होईल असं त्यांनी सांगितलं.

यावेळी एसटी कामगार संघटनेचे उत्तम पाटील,एसटी कामगार सेनेचे नामदेव रोडे, एसटी वर्कर्स काँग्रेस इंटकचे विजय बर्गे, राज्य परिवहन कर्मचारी संघटनेचे दादू गोसावी यांच्यासह एसटी कर्मचारी सहभागी झाले होते.राज्य सरकारी कर्मचार्यां प्रमाणं वेतन मिळालंच पाहिजे अशा घोषणा देत कर्मचार्यांनी आपल्या मागण्यांकडं लक्ष वेधले.

मृतदेह घेऊन नातेवाईक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात

कोल्हापूर : कोल्हापुरातील कनाननगर परिसरात राहणाऱ्या वंदना राजेश वाघमारे यांचा सोमवारी रात्री उशिरा मृत्यू झाला. मात्र दफन विधीसाठी जागा नसल्यानं त्यांच्या नातेवाईकांनी मृतदेह एका टेम्पोत घालून थेट जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात आणला.

यामुळं प्रशासनाची तारांबळ उडाली. यावेळी नातेवाईकांनी शासनाच्या ढिसाळ कारभाराचा तीव्र शब्दात निषेध केला. महापालिकेचे अधिकारी ख्रिस्ती दफनभूमीच्या जागेविषयी ठोस आश्वासन देत नाहीत तोवर मृतदेह घेऊन परत जाणार नाही असा पवित्रा नातेवाईकांनी घेतला. मात्र बराच वेळ या ठिकाणी महापालिकेचे अधिकारी फिरकलेच नाहीत, त्यामुळं ख्रिस्ती बांधव अधिक आक्रमक झाले.

भीम - कुंतीच्या जयजयकाराने उंब्रज नगरी दुमदुमली

उंब्रज : सोमवारी भीम - कुंतीच्या जयजयकाराने उंब्रज नगरी दुमदुमली. यात्रेला भाविकांचा अभूतपूर्व उत्साह मिळाला. काही वर्षांपासून यात्रेत हत्तीच्या वापरावर निर्बंध आले असले तरी ती कसर अश्ववांनी भरुन काढली. रथातून कुंती मातेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. भीमसेन महाराज व कुंती मातेचा जयजयकार करत उंब्रज येथील मातापुत्र भेटीचा अनोखा सोहळा हजारो भाविकांच्या उपस्थितीत सायंकाळी पार पडला.

प्रतिवर्षी श्रावणातल्या शेवटच्या सोमवारी उंब्रज येथे भीम कुंती उत्सव साजरा केला जातो. भाविकांनी भीमकुंती उत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मुख्य मिरवणुकीत कुंती मातेला घेऊन बसण्यासाठी भीम मंडपात बोली लिलावास सकाळी ११ च्या सुमारास प्रारंभ झाला. यामध्ये भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. सुमारे तासभर लिलाव बोलीसाठी चढाओढ झाली. यावेळी सतीश प्रभाकर जाधव यांनी एक लाख दहा हजाराची सर्वाधिक बोली बोलून कुंती मातेच्या रथात बसण्याचा मान मिळविला. यात्रेच्या इतिहासात ही लिलाव बोली विक्रमी ठरली आहे.

दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास मुख्य मिरवणुकीस प्रारंभ झाला. या मिरवणुकीत बँडच्या तालावर ठेका धरणारे तरूण युवक, त्यापाठोपाठ टाळ मृदुंगाच्या तालावर अभंग वाणी गात हरिनामाचा जयजयकार करणारे भजनी मंडळ असा लवाजमा मिरवणुकीत सहभागी झाला. फुलांनी अच्छादलेल्या छत्र्या, रथाला जुंपलेले अश्व, गुलालाची उधळण आणि तरुणाईचा जल्लोष हे यात्रेचे मुख्य आकर्षण ठरले. दुपारी मुख्य मिरवणूक बाजारपेठेत येताच 'भीमसेन महाराज की जय', 'कुंती माता की जय' च्या जयघोषात गुलाल खोबऱ्याची उधळण करीत परिसर दुमदुमून गेला. मिरवणूक मार्गावर ठीक ठिकाणी कुंती मातेचे दर्शन घेण्यासाठी महिलांसह भाविकांनी गर्दी केली होती.

कुंती मातेची मिरवणूक बाजारपेठेतून महामार्गाच्या पश्चिमेस कॉलेज रोडवरील मारुती मंदिरास प्रदक्षिणा घालून पुन्हा बाजारपेठ मार्गे मिरवणूक सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास भीम मंडपात दाखल झाली. या ठिकाणी भीम व कुंती माता यांच्या भेटीचा अभूतपूर्व व पारंपारिक सोहळा हजारो भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला. त्यानंतर विधिवत पूजाअर्चा करून कुंती मातेची भीमसेन महाराजांशेजारी प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी भाविकांनी भीम महाराज व कुंती मातेचा जयजयकार केला.सोहळ्यास उंब्रजसह परिसरातील हजारो भाविकांची गर्दी झाली होती.